# आदेश

पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी विधी अधिकारी, गट-अ या पदाकरीता लेखा परिक्षा व मुलाखत घेवून निवड मंडळाने निवड केल्यानुसार मा. पोलीस महासंचालक, म.रा.,मुंबई यांचे आदेश क्रमांक : पोमसं/२-अ/विधी अधिकारी -निवड मंडळ/२/२०१७ दिनांक ०४/०९/२०२३ अन्वये श्री. पियुष अरुण पाचकवडे, यांची विधी अधिकारी गट -अ या पदावर पोलीस आयुक्त, अमरावती शहर यां आस्थापनेशी झालेल्या करारनामाच्या दिनांकापासून पुढील ११ महिन्याच्या पुर्णत: कंत्राटी पध्दतीने अटी व शर्तीच्या अधीन राहुन तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यानुसार श्री. पियुष अरुण पाचकवडे हे पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर येथे विधी अधिकारी, गट-अ या पदावर हजर होण्यास आले आहेत. त्यांना मा. पोलीस महासंचालक, म.रा.,मुंबई यांचे आदेश दिनांक ०४/०९/२०२३ मधील नमुद शासन निर्णय तसेच आदेशामधील अटी व शर्तीच्या अधीन राहुन त्यांनी भरुन दिलेल्या करारनाम्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून पोलीस आयुक्त, अमरावती शहर या कार्यालयात विधी अधिकारी, गट-अ या पदावर आज दिनांक ०६/१०/२०२३ रोजी म.पूर्व कंत्राटी पध्दतीने निव्वळ ११ महिन्याकरीता हजर करुन घेण्यात येत आहे.

(१) एकत्रित मासिक मानधन --मानधन रु. ३०,०००/- + दुरध्वनी व प्रवास खर्च रु. ५,०००/- असे एकुण दरमहा रु. ३५,०००/- एवढया मानधनावर तात्पुरते स्वरुपात हजर करुन घेण्यात येत आहे.

(२) सदर पदाची नेमणुक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने तात्पुरते स्वरुपात असेल. त्यांना शासकीय कर्मचारी / अधिकारी म्हणुन गणले जाणार नाही.

(३) सदरची नेमणुक ही करार पध्दतीने दिनांक ०६/१०/२०२३ ते ०५/०९/२०२४ या कालावधीत ११ महिन्यांकरीता तात्पुरत्या स्वरुपात राहील. त्यानंतर ती आपोआपच संपुष्टात येईल.

(४) सदर एकत्रित वेतन व भत्ता यावर होणारा खर्च हा २०५५ (०१) (०१) या मुख्य लेखा शिर्षाखाली खर्च करण्यात येईल.

**(सागर पाटील)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस